International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 Nov-Dec 2023

# नागरी समाजाची भूमिका

**श्री पांडुरंग पंडीत पाटील**
मु.जैताळ,पो.कांडगाव ता.करवीर,जि. कोल्हापूर
**Corresponding Author – श्री पांडुरंग पंडीत पाटील**
**Email:** pandurangp91@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.13990751**

**प्रस्तावना :**

नागरी समाजाची संकल्पना ही एक प्राचीन संकल्पना मानली जाते. जागतिकीकरण व माहिती तंत्रज्ञानातील क्रांतिकारी बदलांमुळे जागतिक समुदाय अगदी जवळ आला आहे. नागरी समाजामध्ये अनेक संस्था, संघटना कार्यरत झाल्या आहेत. अ-राज्य घटकांचे महत्व वाढीस लागले आहे. लोकशाही प्रक्रिया त्यातून प्रभावित व गतिमान होतांना दिसत आहेत. सामाजिक चळवळींमध्ये समान हितसंबंध असलेले गट व व्यक्ति विशिष्ट राजकीय उद्दिष्टांच्या पूर्ततते करिता एकत्र येतात. या संघटनांना समाजव्यवस्थेमध्ये बदल अपेक्षित असतो. यानुसार "नागरी समाज ही एक प्रक्रिया आहे जिच्यामध्ये व्यक्ती आपापसात व आर्थिक आणि राजकीय सत्ताकेंद्रा बरोबर वाटाघाटी, वाद, संघर्ष वा समझौता करतात. नागरी समाज हा लोकशाहीच्या विकासाठी अत्यंत पोषक असत याद्वारे लोकशाही विकसित होत असते.

**नागरी समाज :**

नागरी समाज हा अशासकीय संस्था आणि संस्थांचा एकत्रित समूह आहे ज्यात विविध सांस्कृतिक, धार्मिक आणि विशेष स्वारस्य गटांचा समावेश आहे जे नागरिकांच्या हिताचे आणि इच्छेचे प्रतिनिधित्व करतात आणि त्यांची अंमलबजावणी करतात आणि सामाजिक नियमांची अंमलबजावणी करतात.

**नागरी समाजाचे स्वरूप :**

1. **समान उद्देशाच्या प्राप्तीसाठीचे व्यक्तिंचे मुक्त संघटन:** नागरी समाज म्हणजे समान उद्देशाच्या प्राप्तीकरीता निर्माण झालेले व्यक्तिचे मूक्त संघटन होय. हा समाज कायद्यावर आधारित असतो. नागरी समाजाचे सदस्यत्व हे दमनावर आधारित नसून ते उत्स्फूर्तपणे स्वीकारलेले असते.
2. **स्वतंत्र राजकीय अवकाश :** नागरी समाजाचे स्वतंत्र राजकीय अवकाश असते. राज्यसंस्थेशी त्याचा संबंध असेलच असे मात्र नाही.
3. **बाजार व्यवस्थेपासून स्वतंत्र :** नागरी समाजाचे क्षेत्र बाजार व्यवस्थेपासून मुक्त असते. बाजार व्यवस्थेमध्ये नफा मिळविणे हे सर्व सहभागी घटकांचे मुख्य उद्दिष्ट असते. परंतु नागरी समाजातील घटक नफ्याचे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून काम करत नाहीत. त्यामुळे या क्षेत्रास ना नफा क्षेत्र असे ही संबोधले जाते.
4. **लोकशाहीची उद्दिष्टये साध्य करण्याचे साधन -** नागरी समाजास लोकशाहीची उद्दिष्टये साध्य करण्याचे एक महत्वाचे माध्यम मानले जाते.

**नागरी समाजाची वैशिष्टे :**

- नागरी समाजात स्वतंत्र व उत्तरदायीत्वाची भूमिकेचे एकत्रीकरण झालेले असते.
- नागरी समाजात संकल्पनेस समाजामध्ये महत्व असते.
- नागरी समाजात स्वः संघटीत व गतीतून असतो.
- नागरी समाजातामध्ये राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व अर्थीक जागृती निर्माण करते.
- नागरी समाजात प्रशासकीय धोरणे कायदे व योजने मध्ये लोकांना सहभाग घ्यायला लावतो.
- नागरी समाजात लोकशाही, बंधुभाव व मानवी कल्याणांच्या भावनेचा प्रचार व प्रसार करतो.
- नागरी समाजात राज्याच्या मनमानी तसेच लोकहीत विरोधी धोरकांना विरोध करतो.
- नागरी समाजात नागरीकांच्यात देशाप्रती निष्ठा तसेच कर्तकांच्या प्रती जाकरुकता निर्माण करतो
- नागरी समाजात व्यक्ती जीवनात राज्याचा कमीत कमी हस्तपेक्षा असावा अशी भूमिका घेतो.
- नागरी समाजात सरकारी कार्यालायीन कामकाज पारदर्शीपणा आणतो
- नागरी समाजात नाकरिकांच्या आधिकारांना मान्यता मिळवून देतो
- नागरी समाजात देशाच्या राजकीय, प्रशासकीय किया प्रक्रियामध्ये लोकसहभागांची संधी मिळवून देतो.
- नागरी समाजात राज्याच्या सत्तेचे विकेंद्रकरण घडवून आणण्याचे समर्थन करतो.

**समकालीन नागरी समाजाची भूमिका :-**

**१) सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेस मदत -**

सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात नागरी संघटनांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. मानवी हक्क, कामगार व विकासाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांनी याची विशेष दखल घेतली आहे. अनेक स्वयंसेवी संघटनांनी जागतिक बॅंक, जागतिक नाणेनिधी व जागतिक व्यापार संघटना सारख्या संघटनांच्या उदारमतवादी धोरणांविरूद्ध जन आंदोलन उभे करून निषेध व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

**२) प्रशासनाचे लोकशाहीकरण :-**

ज्या सामाजिक गटांना कुठेच प्रतिनिधित्व मिळत नाही अशा गटांचा आवाज जगासमोर मांडून नागरी संघटना महत्वाची भूमिका बजावत आहेत. या कार्यातून ते जागतिक लोकशाहीला एक प्रकारे चालना देत आहेत. जागतिक बॅंक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक व्यापार संघटना या तीन प्रमुख आंतरराष्ट्रीय संस्थांच्या व्यवहारामध्ये लोकशाहीच्या तत्वांचा पुरस्कार करून त्यांच्या कारभारामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक नागरी संघटना आंदोलन करीत आहेत.

**३) विकासा संबंधित टीकात्मक व पर्यायी दृष्टीकोन :-**

२० शतकाच्या शेवटच्या दोन दशकात सामाजिक न्याय, सहभाग, सबलीकरण, टिकाऊपणा या मुद्द्यांवर आधारीत विकासाच्या नव्या संकल्पना मांडल्या गेल्या. पर्यावरणवादी स्त्रीवादी व इतर तत्सम सामाजिक चळवळींनी या संकल्पना विकसित केल्या. उदा. भारतातील नर्मदा बचाव आंदोलन व चिपको आंदोलन, संयुक्त राष्ट्रांच्या विविध परिषदांना समांतर परिषदा आयोजित करणे हा नियमच होवून गेला आहे.

**४) संघटना व सल्लागाराची भूमिका :-**

बालमजूरी, पर्यावरणाचा ऱ्हास, मानवी हक्कांचा भंग यासारख्या क्षेत्रात नागरी संघटनांनी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. नागरी समाजाच्या प्रयत्नामुळे जागतिक अर्थकारणात व राजकारणात मोठे बदल घडून आले. जसे की, बालमजुरी विरोधातील नागरी समाजाच्या कार्यामुळे अनेक राज्यांना बालमजुरी विरोधी कायदे संमत करावे लागले वा अस्तित्वात असणाऱ्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी लागली.

**५) विविध सेवांचा पुरवठा -**

नागरी समाजाकडून जगभरात विविध सेवा पुरविल्या जातात. जगभरात स्वयंसेवी संस्था विविध जीवनावश्यक वस्तूंचा व सेवांचा पुरवठा करण्यातही महत्वाची भूमिका पार पाडताना दिसतात. अनेक प्रसंगामध्ये त्यांनी मानवी, कल्याणकारी व निकालासाठीची मदत पुरविली आहे. बऱ्याच वेळा राज्यांना ही काही ठिकाणी मदत पोहचवणे कठिण होते अशा परिस्थितीत व ठिकाणीही नागरी समाज पोहचतो.

**सारांश :**

नागरी समाजात राजकीय, सामाजिक आणि नागरी हक्क, कायद्याचे राज्य, प्रातिनिधिक संस्था, सार्वजनिक क्षेत्र आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अनेक संघटनांचा समावेश आहे. राज्य आणि नागरी समाज या दोन संकल्पना कालांतराने विकसित होत गेल्या आणि त्यांच्यासोबत त्यांची वैशिष्टयेही विकसित झाली. प्रत्येकाने दुसऱ्याला अनुरूप मूल्य दिले आहे. राज्य आणि नागरी समाज यांचा एकमेकांशी जवळचा संबंध आहे. नागरी समाजाशिवाय राज्याची कल्पना करता येत नाही आणि राज्याशिवाय नागरी समाजाचा विचार करता येत नाही. नागरी समाजाची संपूर्ण ओळख सर्वसाधारणपणे परिस्थितिवैज्ञानिक, लोकसंख्यात्मक, संस्थात्मक, सामाजिक मूल्यात्मक, स्तरीकरणात्मक, संरचनाभेदात्मक व सामाजिक रोगचिकित्सात्मक या सात दृष्टिकोनांतून होते. या दृष्टिकोनांतून एकाच समाजाच्या विविध अंगांचे ज्ञान होते. ही विविध अंगे अर्थातच परस्परांवर अवलंबून आहेत.

**संदर्भसूची :**


1. Bergel, E. E. Urban Sociology, New York, 1965.
2. प्रा. सुमंत यशवंत, "भारतीय लोकशाही , नागरी समाज, वंचित समूह", युनिक अकादमी , पुणे
3. धनागरे, द. ना., संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव, पुणे, २००५.
4. Elliott, Carolyn M. (eds.), Civil Society and Democracy : A Reader, New Delhi, 2003.
5. Kaviraj, Sudipta; Khilnani, Sunil (eds.), Civil Society : History and Possibilities, Cambridge, 2001.